पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क प्रभाग कार्यालय, भोसरी-२६
जा.क्र.कप्रस/कावि/ १६१ /२०१३
दि. ३ / ७ /२०१३

प्रति,

मा.----------------------------
सदस्य/सदस्या
क प्रभाग समिती

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक १० / ७ /२०१३ रोजी दु. ३.०० वाजता आयोजित केलेबाबत.

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक १०/ ७ /२०१३ रोजी दुपारी ३.०० वाजता क प्रभाग कार्यालयाचे श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

प्र. प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
क प्रभाग समिती

प्रत- १. सर्व संबंधित शाखाप्रमुख
२. कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क प्रभाग समिती
कार्यपत्रिका क्रमांक-४

दिनांक- १० / ७ /२०१३ वेळ- दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक १०/ ७ /२०१३ रोजी दुपारी ३.०० वाजता क प्रभाग कार्यालयातील श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

दिनांक ५/ ६ /२०१३ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.३) सभावृत्तांत कायम करणे.

विषय क्रमांक १) प्रभाग क्र. ३५ भोसरी गावठान परिसर पाणीपुरवठा विषयक देखभाल दुरुस्तीची कामे करणेकामी येणारे र.रु.३,००,०००/- चे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.१०/७/२०१३ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक २) धावडे वस्ती व इतर ठिकाणी पाणीपुरवठा विषयक दुरुस्ती व देखभालीची कामे करणेकामी येणारे र.रु.३,००,०००/- चे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.१०/७/२०१३ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक ३) जलक्षेत्र क्र. क/३ मध्ये ठिकठिकाणी पाणीपुरवठा विषयक किरकोळ देखभाल व दुरुस्तीची कामे करणे (२०१३-१४) कामी येणारे र.रु.४,८०,०००/- चे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.१०/७/२०१३ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक ४) पिंपरी चिंचवड महानगरपालिका क प्रभाग कार्यालय क्षेत्रातील मौजे भोसरी येथील राजमाता जिजाऊ उड्डाण पुलाखाली वाहनतळ विकसित करणेत आलेला असून सदर वाहनतळाचा ठेका ३ व ५ वर्षासाठी नियमानुसार देणेबाबत मा.आयुक्त यांनी आदेश क्र.भूजि/६/कावि/४६८/२०११ दि. १६/८/२०११ अन्वये प्रभाग अधिकारी यांना अधिकार प्रदान केलेले आहेत. राजमाता जिजाऊ उड्डाण पुलाखाली वाहनतळ करणे आवश्यक असून वारंवार होणा-या अतिक्रमण कारवाई व वाहतूक कोंडी टाळणे व मनपा उत्पन्नात वाढ करणेकामी राजमाता जिजाऊ उड्डाणपुलाखाली वाहनतळ करणेकामी मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.१०/७/२०१३ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक ५) प्रभाग क्र. ३८ नेहरुनगर, विठ्ठलनगर या भागात पाणीपुरवठा देखभाल दुरुस्ती कामे करणेकामी र.रु. ३,००,०००/- चे पूर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक ६) प्रभाग क्र. ३७ फुलेनगर, गवळीमाथा लांडेवाडी या भागात पाणीपुरवठा देखभाल दुरुस्ती कामे करणेकामी र.रु. ३,००,०००/- चे पूर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

प्र. प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
क प्रभाग समिती

क्र.कप्रस/कावि/ १६१ /२०१३
दि. ३/७/२०१३